**प्रपत्र सी – ७**

**वृत्तपत्रे, समाजमाध्यमे व पक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यासाठी राजकीय पक्षांकरीता ज्याची उमेदवार म्हणून निवड झालेली आहे, तसेच इतर गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या व्यक्तींची निवड का केली नाही, अशा निवडीच्या कारणांसहित, अशा उमेदवाराबाबतची प्रलंबित फौजदारी खटल्यांसह माहिती**

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४**
राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र**

१) मतदारसंघाचे नाव : **१४४ – कल्याण ग्रामीण विधानसभा**
२) उमेदवाराचे नाव : **राजेश गोवर्धन मोरे**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | **पूर्ववर्ती गुन्हेगारी** | |
| | अ. गुन्ह्याचे स्वरूप | १. भा. दं. वि. कलम १८८, २८३, स. म. पो. का, १९५१चे कलम १४० प्रमाणे, भा.दं.वि. कलम १८८ लोकसेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाचा अवज्ञा २८३ सार्वजनिक रस्त्यातील किंवा नौकानयन मार्गातील धोका किंवा अटकाव , महाराष्ट्र पोलिस कायदा १९५१चे कलम १४० कलम ६८ प्रमाणे पोलिसांचे आदेशाचा भंग-शिक्षा |
| | | २. भा. दं. वि. कलम १४३, १४५, १४६, १४७, १४९, ११७<br>मुंबई पोलिस कायदा कलम ११०, ११७, ३७(१) (३), १३५<br>बेकायदेशीर जमाव जमावाला पांगवण्याचा आदेश झाल्याचे माहित असुन त्यात सामील होणे. दंगा करणे व त्याबद्दल शिक्षा, समान उद्दीष्ट साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा घटक, जनतेकडून व दहाहून जास्त व्यक्तीकडून अपराध घडूण येण्यास अपप्रेरणा करणे. लोकांसमोर असभ्य वर्तन, अव्यवस्थेला प्रतिबंध करणेसाठी विवक्षित कृतींना मनाई करण्याचे आदेश. आदेश भंग करणे. |
| | ब. प्रकरण क्रमांक | १. समरी क्रि केस नं.१५७०/२०१९ |
| | | २. नियमीत फौजदारी केस नं.७७४/२०१७ |
| | क. न्यायालयाचे नाव | १. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे तिसरे न्यायालय कल्याण पश्चिम, समरी क्रि केस नं.१५७०/२०१९ |
| | | २.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे चौथे न्यायालय कल्याण पश्चिम<br>नियमीत फौजदारी केस नं.७७४/२०१७ |
| | ड. दोषरोप निश्चित केले आहेत किंवा नाही (होय / नाही ) | १. नाही |
| | | २. नाही |
| | इ. दोषसिद्धीचा दिनांक, असल्यास | लागू नाही |
| | फ. झालेल्या शिक्षेचा तपशील, असल्यास | लागू नाही |
| | ग. द्यावयाची आवश्यक इतर कोणतीही माहिती | निरंक |
| २ | उमेदवाराच्या निवडीकरिता कारणे निवड हि उमेदवाराची अर्हता, संपादणूक व गुणवत्तेच्या संदर्भात असेल व केवळ मतदानात "निवडून येण्याची क्षमता" अशी नसेल (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |
| ३ | गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या इतर व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड का होऊ शकत नाही याची कारणे (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |

**अनु.क्र. २**

उमेदवाराची या मतदार संघात गेली २० वर्ष जनतेत कार्य करणारा, तळमळीने जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी धडपडणारा कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. उमदेवार पदवीधर आहेत. रात्रंदिवस काम करण्याची तयारी असते. कोरोना काळात धैर्याने सर्व सामान्य रुग्णांच्या सेवेसाठी रात्री अपरात्री धावून जाणारा कार्यकर्ता म्हणून मतदारांनी त्यांना पाहिले आहे. सातत्याने अनेक वेळा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका नगरसेवक व सभागृह नेता, स्थायी समिती सदस्य आदी पदे भूषविली आहेत. वारकरी संप्रदायामध्ये देखील कार्यामुळे उमेदवाराची लोकप्रियता आहे. या सर्व बाबींचा विचार करून शिवसेना पक्षातर्फे **श्री. राजेश गोवर्धन मोरे** यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इतर इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीकरीता या उमेदवाराला आपला पाठींबा दिलेला आहे.

**अनु.क्र. ३**

उमेदवारावर असलेले दोषारोप जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी केलेल्या आंदोलनाच्या वेळी परवानगी न घेतल्याबद्दलचे आहेत. आंदोलन करण्यास किंवा जमाव जमविण्यास बंदी असताना बंदी हुकुम न पाळल्याबद्दलचे आहेत. कोणताही आरोपाबद्दल दोषसिद्धी झालेली नसून ते फक्त प्रथम वर्ग न्यायालयात दाखल आहेत. असा तडफेने जनतेचे प्रश्न रस्त्यावर उतरून सोडविण्याची क्षमता असलेला अन्य उमेदवार आढळला नाही. त्यामुळे अन्य व्यक्तींची निवड करण्यात आली नाही.

शिवसेना
मध्यवर्ती कार्यालय

**आपला,**

**संजय भाऊराव मोरे**
**शिवसेना सचिव**